महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645

मसं/रवका/न.क्र.३४८
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,
माटुंगा, मुंबई ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्र. : ०२२ - ६९४२५१४१

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ६९८ दिनांक १४ / १० / २०२५

**विषय: आदिवासी व नक्षलग्रस्त क्षेत्रात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना देय असलेल्या एकस्तर पदोन्नती तसेच उच्च वेतनश्रेणीच्या लाभाबाबत स्पष्टीकरणात्मक सूचना.**

**संदर्भ:** सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. एसआरव्ही २०२२/प्र.क्र.४८/कार्यासन १२ दि. २९.०२.२०२४.

*****

महाराष्ट्र राज्यातील दुर्गम व मागासलेल्या आदिवासी भागांचा तसेच नक्षलग्रस्त संवेदनशिल भागांचा जलद गतीने विकास होण्याच्या दृष्टीने या बिकट क्षेत्रात शासकीय योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी सुधारीत प्रोत्साहनात्मक सवलती वेळोवेळी राबविण्यात येतात व तत्कालीन वीज मंडळा पासून आता कंपनीमध्ये सदर सवलती अंगिकृत करण्यात आल्या आहेत.

२. आदिवासी तसेच नक्षलग्रस्त भागात कार्यरत असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना नियुक्ती अथवा वरीष्ठ पदावर पदोन्नती झाल्यास द्यावयाचा एकस्तर पदोन्नतीचा लाभ आणि विहित कालमर्यादा पूर्ण केल्यानंतर मंजूर करण्यात येणारा अश्वासित प्रगती योजनेचा लाभ देत असतांना अनुसरावयाच्या कार्यपध्दतीबाबत स्पष्टीकरणात्मक मार्गदर्शक सूचना संदर्भिय शासन निर्णयाव्दारे निर्गमित केल्या आहेत. या सुचनांच्या अनुषंगाने कंपनीअंतर्गत एकस्तर पदोन्नतीचा लाभ व कंपनीने विहित केलेल्या कालमर्यादेनुसार मंजूर करण्यात येणारा उच्च वेतनश्रेणीचा लाभ देण्याच्या अनुषंगाने मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याची बाब विचाराधीन होती.

३. या अनुषंगाने, सक्षम अधिकारी यांनी दिलेल्या मंजुरीनुसार आदिवासी व नक्षलग्रस्त क्षेत्रात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना देय असलेला एकस्तर पदोन्नतीचा लाभ व उच्च वेतनश्रेणी लाभाचा विहित कालावधी विचारात घेवून, शासनाच्या धर्तीवर सुधारीत स्पष्टीकरणात्मक सूचना सोबतच्या परिशिष्ट "अ" नुसार निर्गमित करण्यात येत आहेत. या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना देय असलेल्या इतर प्रोत्साहनात्मक सवलती अबाधित राहतील.

४. या अनुषंगाने सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, आदिवासी व नक्षलग्रस्त क्षेत्रात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना देय असलेला एकस्तर पदोन्नतीचा लाभ व उच्चवेतन श्रेणीचे लाभ संगणकीय प्रणालीतून मंजूर करतेवेळी सोबत जोडलेल्या परिशिष्ट "अ" मध्ये नमूद केलेल्या सुधारीत मार्गदर्शक सूचना विचारात घेवूनच सदर लाभ अदा करण्याची पुढील कार्यवाही काटेकोरपणे करण्यात यावी. सदर प्रशासकीय परिपत्रक निर्गमित केल्याच्या दिनांकापासून लागू होईल.

५. सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आले आहे.

**सोबत:** परिशिष्ट "अ"

**( भूषण कुलकर्णी )**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

**प्रत सविनय सादर:**

१) संचालक (वित्त)/(संचलन)/(मासं)/(प्रकल्प)/(वाणिज्य) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय छत्रपती संभाजीनगर/कल्याण.
३) कार्यकारी संचालक (वित्त व लेखा)/(वितरण)/(पायाभूत आराखडा)/(विशेष प्रकल्प)/(मासं)/(सुवअं) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
४) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/नागपूर.

**प्रत सस्नेह रवाना:**

१) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)/(सांघिक वित्त)/(अंतर्गत लेखा परिक्षण)/(सांघिक लेखा)/(माहिती तंत्रज्ञान)/ मुख्य विधी सल्लागार/मुख्य तपास अधिकारी/ कंपनी सचिव म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या.,नाशिक.
३) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई.
४) सर्व मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई. (सांघिक कार्यालय/क्षेत्रीय कार्यालय)

**प्रत रवाना:**

१) महाव्यवस्थापक (मासं)/(मासं-मासंव्यप्र)/(नियोजन), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
३) मा.अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्य अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

**परिशिष्ट 'अ'**

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>घटना</th><th>एकस्तर पदोन्नती व उच्च वेतनश्रेणी लाभ मंजूर करीत असताना अभिप्रेत असलेली कार्यवाही</th></tr>
<tr><td>१</td><td>मूळ नियुक्ती आदिवासी/ नक्षलग्रस्त क्षेत्रात झाली असून कर्मचारी त्याच क्षेत्रामध्ये कार्यरत आहे.</td><td>मूळ नियुक्ती आदिवासी/ नक्षलग्रस्त क्षेत्रात झाल्यानंतर, अशा कर्मचाऱ्यास नियुक्तीनंतर, रूजु झाल्यापासून लगेच एकस्तर पदोन्नती, योजना लागू होते व त्यानुसार तो ज्या पदावर कार्यरत आहे, त्याच्या वरिष्ठ पदाची वेतनश्रेणी देय ठरते.<br>तद्नंतर उच्च वेतनश्रेणी लाभाच्या प्रचलीत तरतुदींच्या अनुषंगाने करावयाची कार्यवाही खालीलप्रमाणे असेल.
<table>
<tr><th></th><th>पदोन्नतीची माहिती</th><th>करावयाची कार्यवाही</th></tr>
<tr><td>पहिला लाभ</td><td>नियुक्ती पासून ०६ वर्षाच्या सेवा कालावधीत प्रत्यक्ष पदोन्नती न मिळाल्यास</td><td>नियुक्तीपासून ०६ वर्षे पदोन्नती पासून वंचित राहिल्यामुळे उच्च वेतनश्रेणीच्या पहिल्या लभास पात्र ठरतो. परंतू, तो एकस्तर योजनेंतर्गत वरिष्ठ पदाची वेतनश्रेणीत वेतन घेत असल्याने त्याला उच्च वेतनश्रेणीचा पहिला लाभ देय ठरणार नाही.<br><br>उदा:- कर्मचारी 'अ' हा सहाय्यक अभियंता या पदावर अदिवासी/ नक्षलग्रस्त क्षेत्रात रूजु झाला असून ६ वर्ष उप कार्यकारी अभियंता या पदाच्या पदोन्नती पासून वंचित राहीला आहे. तथापि तो नियुक्तीच्या दिनांकापासून उप कार्यकारी अभियंता पदाच्या वेतनश्रेणीमध्ये एकस्तर पदोन्नतीचा लाभ घेत आहे. यास्तव त्यास उच्च वेतनश्रेणीचा प्रथम लाभ देय ठरणार नाही.</td></tr>
<tr><td>दुसरा लाभ</td><td>०६ वर्षाच्या सेवेनंतर पुढील ०९ वर्षाच्या कालावधीत प्रत्यक्ष पदोन्नती न झाल्यास (म्हणजेच एकूण १५ वर्ष सेवा कालावधीत एकही पदोन्नती न मिळता, तो मूळ नियुक्तीच्या पदावरच कार्यरत राहिल्यास)</td><td>१५ वर्षाच्या एकूण सेवेनंतर त्यास सेवांतर्गत उच्च वेतनश्रेणीचा दुसरा लाभ देय होईल.<br>सबब, एकस्तर योजनेंतर्गत नियुक्तीच्या मूळ पदाऐवजी पदोन्नतीच्या वरिष्ठ पदाची वेतनश्रेणी घेतली असल्याने १५ वर्षानंतर पदोन्नतीच्या पदाच्या आणखी एक वरिष्ठ पदाची वेतनश्रेणी उच्च वेतनश्रेणीचा दुसरा लाभ म्हणून लागू होईल.<br><br>उदा:- कर्मचारी 'अ' हा प्रथम ६ वर्ष व त्यापुढील ०९ वर्ष असे एकूण १५ वर्ष सहाय्यक अभियंता या पदावर कार्यरत आहे यास्तव त्यास एकूण १५ वर्षांच्या सेवेनंतर त्याला अतिरीक्त कार्यकारी अभियंता या पदाचा उच्च वेतनश्रेणीचा दुसरा लाभ देय होईल.</td></tr>
<tr><td></td><td>०६ वर्षाच्या सेवेनंतर पुढील ०९ वर्षाच्या कालावधीत प्रत्यक्ष</td><td>ज्या पदावर प्रत्यक्ष पदोन्नती झाली त्या पदावर रूजू झाल्यापासून त्याच्या वरिष्ठ पदाची वेतनश्रेणी एकस्तर योजनेंतर्गत देय</td></tr>
</table></td></tr>
</table>

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | पदोन्नती झाल्यास | ठरणार असल्याने त्यास उच्च वेतनश्रेणीचा दुसरा लाभ देय ठरणार नाही.<br><br>उदा:- कर्मचारी 'अ' सहाय्यक अभियंता यांची ०६ वर्षाच्या सेवेनंतर पुढील ०९ वर्षाच्या कालावधीत प्रत्यक्ष उप कार्यकारी अभियंता या पदावर पदोन्नती झाल्यास त्याला पदोन्नतीच्या दिनांकापासून अतिरीक्त कार्यकारी अभियंता या पदाचा एकस्तर पदोन्नतीचा लाभ देय होईल यास्तव त्यास अतिरीक्त कार्यकारी अभियंता उच्च वेतनश्रेणीचा दुसरा लाभ देय ठरणार नाही. |
| | | | **तिसरा लाभ** | एकूण २८ वर्षांच्या कालावधीत प्रत्यक्ष पदोन्नती न झाल्यास (म्हणजेच एकूण २८ वर्ष कालावलधीत त्यास एकही पदोन्नती न मिळता तो मूळ नियुक्तीच्या पदावरच कार्यरत राहिल्यास) | २८ वर्षांच्या एकूण सेवेनंतर त्यास सेवांर्तत तिसरा लाभ देय होईल.<br>सबब, एकस्तर योजनेंतर्गत नियुक्तीनंतर लगेच मूळ पदाऐवजी पदोन्नतीच्या वरिष्ठ पदाची वेतनश्रेणी मिळालेली असल्याने उच्च वेतनश्रेणीचा पहिला लाभ मिळणार नाही. १५ वर्षांनंतर उच्च वेतनश्रेणीचा दुसरा लाभ मिळेल. (म्हणजेच पदोन्नतीच्या पदाच्या आणखीन वरिष्ठ पदाची वेतनश्रेणी लागू होईल) २८ वर्षांनंतर उच्च वेतनश्रेणीचा तिसरा लाभ मिळेल (म्हणजेच पदोन्नतीच्या पदाच्या दोन वरिष्ठ पदांची वेतनश्रेणी लागू होईल)<br><br>उदा:- कर्मचारी 'अ' सहाय्यक अभियंता या पदावर २८ वर्ष प्रत्यक्ष पदोन्नती पासून वंचित राहीला आहे. आता एकूण १५ वर्ष सेवेनंतर त्याला अतिरीक्त कार्यकारी अभियंता या पदाचा उच्च वेतनश्रेणीचा दुसरा लाभ देय होईल व २८ वर्षानंतर कार्यकारी अभियंता या पदाचा उच्च वेतनश्रेणीचा तिसरा लाभ मिळेल (म्हणजेच पदोन्नतीच्या पदाच्या दोन वरिष्ठ पदाची वेतनश्रेणी लागू होईल) |
| | | | | १५ वर्षाच्या सेवेनंतर परंतु २८ वर्ष सेवा होण्यापूर्वी प्रत्यक्षात १ पदोन्नती झाल्यास, | ज्या पदावर प्रत्यक्ष पदोन्नती झाली त्या पदाच्या वरिष्ठ पदाची वेतनश्रेणी एकस्तर योजनेंतर्गत देय असेल तसेच २८ वर्षांनंतर त्यास उच्च वेतनश्रेणीचा तिसरा लाभ देय होईल.<br>एकस्तर पदोन्नती योजनेंतर्गत नियुक्तीनंतर लगेच मूळ पदाऐवजी पदोन्नतीच्या वरिष्ठ पदाची वेतनश्रेणी मिळालेली असल्याने उच्च वेतनश्रेणीचा पहिला लाभ मिळणार नाही. १५ वर्षांनंतर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | उच्च वेतनश्रेणीचा दुसरा लाभ मिळेल. (म्हणजेच पदोन्नतीच्या पदाच्या आणखीन वरिष्ठ पदाची वेतनश्रेणी लागू होईल)<br>त्यानंतर पदोन्नती झाली तरी तो त्यापूर्वीच उच्च वेतनश्रेणीच्या दुसऱ्या लाभांतर्गत प्रत्यक्ष पदोन्नती झालेल्या पदाच्या वरिष्ठ पदाची वेतनश्रेणी घेत असल्याने त्यास एकस्तर पदोन्नती योजनेचा लाभ देय होणार नाही.<br>तदनंतर २८ वर्षांनंतर उच्च वेतनश्रेणीचा तिसरा लाभ देय होईल.<br><br>उदा:- कर्मचारी 'अ' हा सहाय्यक अभियंता या पदावर रूजु झाल्यापासून तो उप कार्यकारी अभियंता पदाच्या वेतनश्रेणीमध्ये एकस्तर पदोन्नतीचा लाभ घेत आहे. यास्तव त्यास उच्च वेतनश्रेणीचा प्रथम लाभ देय ठरणार नाही. १५ वर्ष सेवेनंतर त्याला अतिरीक्त कार्यकारी अभियंता या पदाचा उच्च वेतनश्रेणीचा दुसरा लाभ देय होईल (म्हणजेच पदोन्नतीच्या पदाच्या आणखीन वरिष्ठ पदाची वेतनश्रेणी लागू होईल) यानंतर प्रत्यक्षात उप कार्यकारी अभियंता या पदावर पदोन्नती झाल्यास तो त्यापूर्वीच अतिरिक्त कार्यकारी अभियंता पदाचा उच्च वेतनश्रेणीचा व्दितीय लाभ घेत असल्याने त्यास अतिरिक्त कार्यकारी अभियंता पदाचा एकस्तर पदोन्नती चा लाभ देय ठरणार नाही.<br>तदनंतर २८ वर्षांनंतर त्यास कार्यकारी अभियंता या पदाच्या उच्च वेतनश्रेणीचा तिसरा लाभ देय होईल. |
| | | | २८ वर्षे सेवा होण्यापूर्वी २ किंवा त्यापेक्षा अधिक वेळा प्रत्यक्ष पदोन्नती मिळाल्यास | एकस्तर योजने अंतर्गत वरीष्ठ पदाच्या वेतनश्रेणीत वेतन निश्चीत केल्याने २८ वर्षाच्या एकूण सेवेनंतर त्यास उच्च वेतनश्रेणीचा तिसरा लाभ देय होणार नाही.<br><br>उदा:- कर्मचारी अ हा सहाय्यक अभियंता पदावरून प्रथम उप कार्यकारी अभियंता व तदनंतर अतिरिक्त कार्यकारी अभियंता या पदावर पदोन्नत झाल्यास त्यास अतिरक्ति कार्यकारी अभियंता या पदावर रूजु झाल्यापासून कार्यकारी अभियंता या पदाचा एकस्तर पदोन्नतीचा लाभ देय होईल यास्तव २८ वर्षाच्या एकूण सेवेनंतर त्यास कार्यकारी अभियंता या पदाच्या उच्च वेतनश्रेणीचा तिसरा लाभ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | देय ठरणार नाही. |
| २ | मूळ नियुक्ती आदिवासी/ नक्षलग्रस्त क्षेत्रात झाली असून तद्नंतर भविष्यात बिगर आदिवासी/ नक्षलग्रस्त क्षेत्रात बदली झाली आहे . | मूळ नियुक्ती आदिवासी/ नक्षलग्रस्त क्षेत्रात झाल्यानंतर, अशा कर्मचाऱ्यांस, नियुक्तीनंतर लगेच एकस्तर पदोन्नती योजना लागू होते व त्यानुसार तो ज्या पदावर कार्यरत आहे, त्यांच्या वरिष्ठ पदाची वेतनश्रेणी देय ठरते.<br>तद्नंतर अशा कर्मचाऱ्याची काही वर्षाच्या सेवेनंतर बिगर आदिवासी/ नक्षलग्रस्त क्षेत्रात बदली झाल्यास, खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.<br>१) **त्याला देण्यात येत असलेला एकस्तर पदोन्नतीचा लाभ बंद करून** तो ज्या पदावर कार्यरत असेल त्याच पदाची वेतनश्रेणी अनुज्ञेय होईल. त्या पदाची वेतनश्रेणी अनुज्ञेय करत असताना, त्या पदावरील त्याच्या नियुक्तीच्या दिनांकापासून काल्पनिक वेतननिश्चिती करुन त्यानुसार वेतन देय होईल.<br>२) त्याचप्रमाणे अशा कर्मचाऱ्यास बिगर आदिवासी/ नक्षलग्रस्त क्षेत्रात उच्च वेतनश्रेणी लाभ मिळण्याची योजना लागू असल्याने त्याअनुषंगाने पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी. | |
| | | उच्च वेतनश्रेणी लाभ मिळण्यास पात्र ठरल्यानंतर बिगर आदिवासी/ नक्षलग्रस्त क्षेत्रात बदली झाल्यास | आदिवासी/ नक्षलग्रस्त क्षेत्रात कार्यरत उच्च वेतनश्रेणी लाभ मिळण्यास पात्र ठरला तरी त्यास दुहेरी लाभ अनुज्ञेय नसल्याने उच्च वेतनश्रेणीचा लाभ देय होणार नाही.<br>तद्नंतर संबंधित कर्मचाऱ्यांची बिगर आदिवासी/ नक्षलग्रस्त क्षेत्रात बदली झाल्यास, तो उच्च वेतनश्रेणीच्या लाभास पात्र ठरेल. अशा परिस्थितीत तो आदिवासी/ नक्षलग्रस्त क्षेत्रात कार्यरत असताना ज्या दिनांकास उच्च वेतनश्रेणी लाभास पात्र ठरला असता, त्या दिनांकापासून उच्च वेतनश्रेणी लाभाची काल्पनिक वेतननिश्चिती करुन तो ज्या दिनांकास बिगर आदिवासी/ नक्षलग्रस्त क्षेत्रात रुजू होईल त्या दिनांकापासून प्रत्यक्ष वेतन देय ठरेल. **असे करीत असतांना प्रथम दिलेल्या एकस्तर पदोन्नती योजनेच्या लाभाची वसुली करणे अभिप्रेत नाही.**<br><br>उदा:- कर्मचारी 'अ' सहाय्यक अभियंता हा ६ वर्षांच्या कालावधीनंतर उप कार्यकारी अभियंता या पदाच्या उच्च वेतनश्रेणीचा लाभ मिळण्यास पात्र झाला तरी तो यापूर्वीच सदर पदाची वेतनश्रेणी एकस्तर योजनेंतर्गत घेत असल्याने त्यास दुहेरी लाभ देय होणार नाही म्हणजेच त्यास उप कार्यकारी अभियंता या पदाचा उच्च वेतनश्रेणीचा प्रथम लाभ देय होणार नाही.<br><br>कर्मचारी 'अ' हा सहाय्यक अभियंता ६ वर्षांच्या कालावधीनंतर उप कार्यकारी |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | अभियंता या पदाच्या उच्च वेतनश्रेणीचा लाभ मिळण्यास पात्र झाल्यानंतर त्याची बिगर आदिवासी/ नक्षलग्रस्त क्षेत्रात बदली झाल्यास, तो उपकार्यकारी अभियंता या पदाच्या उच्च वेतनश्रेणीच्या लाभास पात्र ठरेल. अशा परिस्थितीत तो आदिवासी/ नक्षलग्रस्त क्षेत्रात कार्यरत असताना ज्या दिनांकास उपकार्यकारी अभियंता या पदाच्या उच्च वेतनश्रेणी लाभास पात्र ठरला असता, त्या दिनांकापासून उपकार्यकारी अभियंता या पदाच्या वेतनश्रेणीमध्ये त्याची काल्पनिक वेतननिश्चिती करुन तो ज्या दिनांकास बिगर आदिवासी/ नक्षलग्रस्त क्षेत्रात रुजू होईल त्या दिनांकापासून त्यास उपकार्यकरी अभियंता या पदाच्या वेतनश्रेणीमध्ये प्रत्यक्ष वेतन देय ठरेल. |
| | | उच्च वेतनश्रेणी लाभ मिळण्यास पात्र ठरण्यापूर्वीच बिगर आदिवासी/ नक्षलग्रस्त भागात बदली झाल्यास | ज्या दिनांकास उच्च वेतनश्रेणी लाभास पात्र होईल, त्या दिनांकापासून त्यास उच्च वेतनश्रेणीचा लाभ देय ठरेल.<br><br>उदा : कर्मचारी 'अ' या सहाय्यक अभियंत्याने आदिवासी/ नक्षलग्रस्त क्षेत्रात ६ वर्षांचा कालावधी पूर्ण करण्यापूर्वीच त्याची बिगर आदिवासी/ नक्षलग्रस्त क्षेत्रात बदली झाल्यास, तो ज्या दिनांकास ६ वर्षांचा कालावधी पूर्ण करेल त्या दिनांकापासून त्या दिनांकापासून त्यास उपकार्यकारी अभियंता या पदाचा उच्च वेतनश्रेणीचा लाभ देय होईल. |
| ३ | मूळ नियुक्ती बिगर आदिवासी/ नक्षलग्रस्त क्षेत्रात झाली असून तद्नंतर आदिवासी/ नक्षलग्रस्त क्षेत्रात बदली झाली असल्यास | मूळ नियुक्ती आदिवासी/नक्षलग्रस्त क्षेत्रात झाली व तदनंतर अशा कर्मचाऱ्याची आदिवासी/नक्षलग्रस्त क्षेत्रात बदली झाल्यास बदली नंतर संबंधित कर्मचारी एकस्तर पदोन्नती योजनेस पात्र ठरतो. अशा कर्मचाऱ्यास एकस्तर पदोन्नती योजना लागू करण्याच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे कार्यवाही करावी- | |
| | | जर अशा कर्मचाऱ्यास आदिवासी/ नक्षलग्रस्त क्षेत्रात बदली होण्यापूर्वीच उच्च वेतनश्रेणीचा लाभ देण्यात आला असल्यास | आदिवासी/नक्षलग्रस्त क्षेत्रात बदली होण्यापूर्वीच उच्च वेतनश्रेणीचा लाभ घेतला असल्याने, आदिवासी/ नक्षलग्रस्त क्षेत्रात बदली झाल्यानंतर त्याला एकस्तर पदोन्नती योजना लागू करण्यात येऊ नये. कारण त्यास पदोन्नतीच्या वरिष्ठ पदाच्या वेतनश्रेणीचा दुहेरी लाभ अनुज्ञेय नाही.<br><br>उदा:- कर्मचारी 'अ' सहाय्यक अभियंता यांची बदली अदिवासी/ नक्षलग्रस्त क्षेत्रात होण्यापूर्वीच ते मूळ नियुक्तीवर बिगर अदिवासी/ नक्षलग्रस्त क्षेत्रात कार्यरत असून ६ वर्ष पुर्ण करुन उप कार्यकारी अभियंता या पदाचा उच्च वेतनश्रेणीचा लाभ घेत असल्याने त्याची आदिवासी/ नक्षलग्रस्त क्षेत्रात बदली झाल्यानंतर |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | त्यास एकस्तर पदोन्नती योजनेचा लाभ देण्यात येउ नये. कारण त्यास पदोन्नतीच्या वरिष्ठ पदाच्या वेतनश्रेणीचा दुहेरी लाभ अनुज्ञेय नाही. |
| | | जर अशा कर्मचाऱ्यास आदिवासी/ नक्षलग्रस्त क्षेत्रात बदली होण्यापूर्वी उच्च वेतनश्रेणीचा लाभ मिळण्यास पात्र ठरला नसल्याने हा लाभ देण्यात आला नसल्यास | आदिवासी/नक्षलग्रस्त क्षेत्रात बदली झाल्यानंतर त्याला एकस्तर पदोन्नती योजनेंतर्गत पदोन्नतीच्या वरिष्ठ पदाच्या वेतनश्रेणीचा लाभ देय होईल.<br>(तद्नंतर आदिवासी/ नक्षलग्रस्त क्षेत्रात कार्यरत असतानाच उच्च वेतनश्रेणीस पात्र ठरल्यास सदर तक्त्यातील अ.क्र.१ नुसार कार्यवाही करावी.)<br><br>उदा:- कर्मचारी 'अ' सहाय्यक अभियंता याची बदली अदिवासी/ नक्षलग्रस्त क्षेत्रात होण्यापूर्वी उच्च वेतनश्रेणी लाभाकरीता पात्र नसल्याने त्यास उप कार्यकारी अभियंता या पदाचा उच्च वेतनश्रेणीचा लाभ देण्यात आला नसेल तर आदिवासी/नक्षलग्रस्त क्षेत्रात बदली झाल्यानंतर त्यांस उप कार्यकारी अभियंता या पदाचा एकस्तर पदोन्नती योजनेचा लाभ देय होईल.<br>(तद्नंतर कर्मचारी 'अ' आदिवासी/ नक्षलग्रस्त क्षेत्रात कार्यरत असतानाच उच्च वेतनश्रेणीस पात्र ठरल्यास सदर तक्त्यातील अ.क्र.१ नुसार कार्यवाही करावी.) |

**टिप :-** १) कंपनीमध्ये ज्या कर्मचाऱ्यांना पदोन्नतीचा मार्ग उपलब्ध नाही त्यांचा उच्च वेतनश्रेणी लाभाचा प्रथम तसेच व्दितीय लाभाचा कालावधी प्रत्येकी सहा वर्षांनी गणण्यात येतो. अशा कर्मचाऱ्यांच्या बाबतीत उच्च वेतनश्रेणीचा प्रथम/ व्दितीय लाभ मंजूर करते वेळी वरील तक्त्यातील सूचना विचारात घेउन प्रकरणपरत्वे कालनिहाय कार्यवाही करण्यात यावी.

२) उच्च वेतनश्रेणीचे लाभ मंजूर करतेवेळी प्रथम, व्दितीय तसेच तृतीय लाभाकरीता जो कालावधी गणण्यात येतो त्याकरीता सा.आ. ७४(क) दि. ३०.४.१९७४, सा.आ. क्र. १११(क) दि. १३.०५.१९८२, प्रशासकीय परिपत्रक क्र. ३०४ दि. २८.०७.२०१० व प्रशासकीय परिपत्रक क्र. ३४२ दि. ०७.०६.२०११ मधील प्रचलित तरतुदी तसेच वरील तक्त्यातील सूचना विचारात घेउन कालनिहाय कार्यवाही करण्यात यावी.

३) उपरोक्त तरतुदींनुसार एखादा कर्मचारी आदिवासी/ नक्षलग्रस्त भागात कार्यरत असतांना उच्च वेतनश्रेणीच्या लाभास पात्र ठरतो. तथापी एकस्तर पदोन्नती योजनेचा लाभ घेत असल्यामुळे त्यास उच्च वेतनश्रेणीचा लाभ प्रत्यक्ष प्रदान करण्यात येत नाही, अशा प्रकरणी त्यास उच्च वेतनश्रेणीचा लाभ मंजूर केल्याचा काल्पनिक आदेश निर्गमित करून त्याची नोंद त्याच्या सेवापुस्तकामध्ये आणि SAP प्रणालीत घेण्यात यावी.

*****